**फौजदारी चौकशी अर्ज क्र.१२/२०२४**

पूनम वि. निलेश

CNR No. MHRG090000812024

**<u>नि.क्र.०५ वरील आदेश</u>**

**<u>(दिनांक ०५/०८/२०२४ रोजी पारित)</u>**

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम १८, १९ व २३ अन्वये अंतरीम आदेश, निवासी आदेश व संरक्षणात्मक आदेशासाठी दाखल केला असून तिचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे.

०२. अर्जदार व सामनेवाला यांचा हिंदू शास्त्र पद्धतीने दिनांक २२.०६.२०२२ रोजी मौजे खारी, ता. रोहा येथे विवाह झाला.

०३. अर्जदाराचे कथन असे की, विवाहानंतर अर्जदार अंधार आळी, रोहा, ता. रोहा येथे नांदावयास गेली. सामनेवाला यांनी अर्जदार हिला विवाहापासून मानसिक व आर्थिक त्रास दिला आहे. सामनेवाला अर्जदाराकडे जाणूनबुजून दूर्लक्ष करीत असे. अर्जदाराला जेवणावरुन बोलत असे, कुठेही जावून देत नसे, कोणाशीही बोलू देत नसे. अर्जदाराला माहेरी फोन करायचे असल्यास सामनेवालाच्या समोर फोन करायला लावत असे परंतू स्वतः फोन घेवून अर्जदाराच्या नावाने तिच्या

मावशीच्या मुलींना घाणेरडे मेसेज व अश्लिल व्हिडीओ पाठवत असे.

०४. अर्जदाराला तिच्या मोठ्या बहिणीकडून समजले असता तिने सामनेवाल्यास याबाबत जाब विचारला असता सामनेवाला याने अर्जदारास शिवीगाळ करुन तिला मारण्यासाठी अंगावर धावून गेला. तसेच सामनेवाला अर्जदाराला तिचे वडील मयत झाले तेव्हापासून माहेरच्या घराचा ताबा तसेच तिच्या आई व वडीलांचे दागिने आणायला सांगत असे नाहीतर तुझी बहिण सर्व गिळेल असे बोलून अर्जदारास भडकावीत असे.

०५. सामनेवाला जसे बोलेल तसेच अर्जदारास वागावे लागत असे. अर्जदाराला मोलकरीणसारखी वागणूक दिली आहे. तिला स्वतंत्रपणे जगून दिले नाही. अर्जदाराला खुप मानसिक व आर्थिक त्रास होत असल्यामुळे ती माहे डिसेंबर २०२३ मध्ये माहेरी खारी येथे गेली.

०६. अर्जदाराला सामनेवाल्यापासून जिवाला धोका निर्माण झाल्याने अर्जदार नाईलाजास्तव माहेरी मु. खारी येथे आई–वडीलांकडे राहत आहे. सामनेवाला ट्रान्सपोर्ट मध्ये खाजगी नोकरी करीत असून त्याला दरमहा रक्कम रु.२५,०००/– पगार मिळतो.

०७. अर्जदार पुढे असे कथन करतात की, तिला सध्या पुर्णपणे माहेरी

आई–वडीलांच्या आर्थीक आधारावर रहावे लागत आहे. सदरचा मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यानच्या काळात तात्पुरत्या स्वरुपात सामनेवाला याने दर महा रु.१२,०००/– उदरनिर्वाहाकरीता द्यावे ही विनंती केली आहे.

०८. अर्जदाराने तिचा मूळ अर्ज दाखल केल्यानंतर या न्यायालयातून सामनेवाल्यास नोटीस काढून सदर प्रकरणा बाबत कळविण्यात आले. सामनेवाला हे दि.१८/०४/२०२४ रोजी त्यांच्या वकीलांमार्फत न्यायालयात हजर झाले. सामनेवाला यांना अर्जावर म्हणणे दाखल करणेकरिता पुरेशी संधी देवून देखील त्यांनी म्हणणे दाखल केलेले नाही, त्यामुळे नि.क्र.११ वरील अर्जावर दि. १२/०७/२०२४ रोजी प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालविणेचा आदेश करण्यात आला.

०९. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **क्र.** | **मूद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने ती कौटूंबिक हिंसाचार पीडीत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे काय? | होकारार्थी |
| २. | अर्जदार ही संरक्षणाचा आदेश मिळणेस पात्र आहे काय? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | अर्जदार ही विनंती केल्याप्रमाणे अंतरीम आर्थिक साहय प्रति रक्कम रु.१२,०००/– मिळविण्यास पात्र आहेत काय? | अंशतः होकारार्थी |
| ४. | अर्जदार हे विनंती केल्याप्रमाणे निवासी आदेश मिळविण्यास पात्र आहेत काय? | नकारार्थी |
| ५. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**:: कारणमिमांसा ::**

**<u>मुद्दे क्र.०१ ते ०४ करीता :–</u>**

१०. अर्जदाराचे कथनाप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांचेमधील वैवाहिक संबंध आजही अस्तित्वात आहेत. प्रथम दर्शनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. सामनेवाला अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाणीसाठी अंगावर धावत जात असे. अर्जदाराला सामनेवाल्यापासून जिवाला धोका निर्माण झाल्याने अर्जदार नाईलाजास्तव माहेरी मु. खारी येथे आई–वडीलांकडे राहत आहे. त्यामुळे अर्जदार ही घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे. अर्जदार ही तिच्या माहेरी आश्रयास आहे. अर्जदाराच्या पालनपोषणाची जबाबदारी ही सामनेवाला याची आहे. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला यांचे कडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे.

११. सामनेवाला अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाणीसाठी अंगावर धावत

जात असे. तसेच तिला वडीलांच्या पश्चात त्यांची मालमत्ता अर्जदाराला मिळणेसाठी तिला जबरदस्ती करीत आहे. यावरुन प्रथमदर्शनी हे स्पष्ट होते की, सामनेवाल्याकडून अर्जदाराला धोका संभवतो. त्यामुळे कलम १८ प्रमाणे सामनेवाल्यापासून सुरक्षा आदेश मिळणेसाठी अर्जदार पात्र आहे.

१२. अर्जदार हिच्या मते सामनेवाला ट्रान्सपोर्ट मध्ये खाजगी नोकरी करीत असून त्याला दरमहा रक्कम रु.२५,०००/– पगार मिळतो. अर्जदाराने तिचे नि.क्र.६ कडे तिचे मालमत्ता व दायित्वाबाबत प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर प्रमाणपत्रावरुन अर्जदार ही कोठेही नोकरी करीत नाही व तिला उत्पन्नाचे साधन नाही असे दिसून येते. परंतू अर्जदाराने सामनेवाल्याचे उत्पन्नाबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही. प्रथम दर्शनी तरी सामनेवाला याचे उत्तन्न किती आहे हे दाखविणेची जबाबदारी अर्जदाराची आहे. अर्जदाराची पालनपोषाणाची संपूर्ण जबाबदारी पती म्हणून सामनेवाला यांची आहे. अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहात आहेत. त्यामुळे तिच्या निवासा बाबत आदेश हे पुरावा दाखल केल्यानंतर करणे न्यायोचीत ठरेल.

१३. अर्जदाराला तिच्या अन्न, वस्त्र, निवारा व औषधोपचार इ. मुलभूत गरजा भागवायच्या आहेत. त्याकरीता अर्जदाराला आर्थिक मदतीची गरज आहे.

सदर आर्थिक मदत अंतरिम पोटगीच्या स्वरुपात सामनेवाला यांनी अर्जदारास करणे आवश्यक आहे. अर्जदार व सामनेवाला यांचे राहणीमानाचा व त्यांच्या उत्पन्नाचा विचार करता अर्जदार हिचे करिता दरमहा रु.३५००/– इतकी अंतरिम पोटगी देण्याचे आदेश करणे हे योग्य व न्यायाचे होईल. या कारणावरून मी मुद्दा क्र.०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी, मुद्दा क्र.०३ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.०४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाल्याने अर्जदाराविरुध्द कुठलाही कौटुंबिक हिंसाचार करू नये असा अंतरीम आदेश पारीत करण्यात येतो.

३. सामनेवाला यांनी अर्जदार यांचे करिता दरमहा रु. ३५००/– (अक्षरी तीन हजार मात्र) पोटगी इतके आर्थिक अंतरिम साहय अर्ज दाखल केलेपासून मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत दयावे.

४. या आदेशाबाबत संरक्षण अधिकारी व संबंधीत पोलीस ठाणे यांना कळविण्यात यावे.

५. या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देण्यात यावी.

MEGHA CHANDRAKANT HASGE

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2024.08.06 13:14:09 +0530

स्थळ : रोहा, (एम. सी. हासगे)

दि.०५.०८.२०२४ सह न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.